MEETING NO. / सभा नं 1 DATE / तारीख 04.09.2021

| RESOLUTION NO. / ठराव नं | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS / हजर सभासद व ठराव | REMARKS / शेरा |
|---|---|---|
| | महिला कला वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथील महाविद्यालय विकास समितीची सभा दिनांक ४.९.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. डॉ. नितीन श. थांडे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली. | |
| | सभेला खालील सदस्यगण उपस्थित होते. | |
| १ | मा. डॉ. नितीन आर. थांडे - अध्यक्ष | |
| २ | मा. श्री. वाय. व्ही. चौधरी - सचिव | |
| ३ | मा. ॲड. यु. एस. देशमुख - सदस्य | |
| ४ | मा. प्रा. (डॉ.) एच. एम. देशमुख - सदस्य | |
| ५ | मा. प्रा. डॉ. एस. एस. जगताप - प्राचार्य/सचिव | |
| ६ | मा. श्री. एन. बी. हिवसे - सदस्य | |
| ७ | प्रा. डॉ. ए. एन. पळवेकर - विभागप्रमुख प्रतिनिधी | |
| ८ | प्रा. डॉ. व्ही. डी. कापसे - IQAC प्रतिनिधी | |
| ९ | प्रा. डॉ. पी. पी. दंदे - प्राध्यापक प्रतिनिधी | |
| १० | सौ. एम. एम. देशमुख - प्राध्यापक प्रतिनिधी | |
| ११ | श्री. एस. एस. झोडे - शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधी | |
| १२ | कु. यु. आर. खरड - महा. विद्यार्थीनी प्रतिनिधी | |
| | सभेसमोर येणारे विषय :- | |
| १ | दिनांक २०/०३/२०२० रोजी घेण्यात आलेल्या महाविद्यालय विकास समीतीच्या सभेच्या इतिवृत्तास मंजूरी प्रदान करणे. | |
| २ | कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती नसल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण हे ऑनलाईन देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याबाबत. | |
| ३ | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सन २०२१ मध्ये घ्यावयाच्या परिक्षा संदर्भातील करावयाच्या कार्यवाही/व्यवस्था याविषयी माहिती. | |
| ४ | करीअर व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आर्थिक वर्ष २०१९-२० चे अंकेक्षण अहवालास मंजूरी प्रदान करणे. | |

Scanned with CamScanner

| RESOLUTION NO. ठराव नं | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|
| (५) | मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय. | |

महाविद्यालय विकास समितीची सभा दिनांक ०४.०१.२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता प्राचार्यांचे कार्यालय, महिला कला - वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षतेखाली मा. डॉ. नितीन रा. धांडे उपस्थित होते.

महाविद्यालय विकास समितीचे सन्माननिय पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रतिनिधींचे स्वागत करुन मा. अध्यक्षांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली.

सभेत खालील प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली व ठराव संमत करण्यात आले.

**विषय क्र १ :-** दि. २०/०३/२०२० रोजी घेण्यात आलेल्या महाविद्यालय विकास समितीच्या सभेच्या इतिवृत्तास मंजूरी प्रदान करणे.

**ठराव क्र १ :-** मागील सभा दि. २०/०३/२०२० रोजी घेण्यात आलेल्या महाविद्यालय विकास समिती सभेच्या इतिवृत्ताचे वाचन प्राचार्य तथा सदस्य सचिव यांनी सभेमध्ये केले. त्यावर सर्वंकष चर्चा करण्यात आली. व सदर इतिवृत्त कायम करण्यात यावे, असे ठरले.

सुचक :- श्री. एन. बी. खिरडे
अनुमोदक :- प्रा. (डॉ.) एच. एम. देशमुख

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र २ :-** कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थित नसल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण हे ऑनलाईन देण्याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्याबाबत.

**ठराव क्र २ :-** कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती नसल्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण हे ऑनलाईन देण्याबाबत करण्यात

Scanned with CamScanner

MEETING NO. / सभा नं ______ DATE / तारीख ______

| RESOLUTION NO. ठराव नं | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव | REMARKS शेरा |
|---|---|---|

आलेल्या कार्यवाहीचा अहवाल, ऑनलाईन तासिकांचे वेळापत्रक, ऑनलाईन तासिकांबाबतचे प्राध्यापकांचे विवरणपत्र तसेच ऑनलाईन प्रक्रियेसाठी महाविद्यालयामार्फत खरेदी करण्यात आलेल्या साधन-सामुग्री (Software) बाबतची माहिती व त्याकरीता आलेल्या खर्चाची माहिती प्राचार्य/सचिव यांनी सभेसमोर सादर केली. त्यावर सर्वंकष चर्चा करण्यात आली. महाविद्यालयामध्ये ऑनलाईन तासिका घेण्याबाबतचे महाविद्यालयाचे नियोजन व उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीबाबत समाधान व्यक्त करण्यात आले. महाविद्यालयामध्ये सदर ऑनलाईन तासिका घेण्याबाबत काही अडचणी उद्भवल्यास संस्था कार्यालयाकडे पत्रव्यवहार करावा, असा ठराव.

सुचक - प्रा. (डॉ.) एच.एम. देशमुख
अनुमोदक - श्री. वाय. व्ही. चौधरी.

विषय क्र.३:- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सन २०२१ मध्ये घ्यावयाच्या परीक्षा संदर्भातील करावयाच्या कार्यवाही/व्यवस्था याविषयी स्थिती.

ठराव क्र.३:- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सन २०२१ मध्ये घ्यावयाच्या परीक्षा संदर्भात विद्यापीठ उन्हाळी २०२० परीक्षेला प्रवेशित झालेल्या विद्यार्थीसंची माहिती व विद्यापीठाचे निर्देशानुसार ऑनलाईन व ऑफलाईन परीक्षेबाबत महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीबाबतचा सविस्तर अहवाल प्राचार्य/सचिव यांनी सभेसमोर सादर केला, त्यावर सर्वंकष चर्चा करण्यात आली, पुढे होणाऱ्या विद्यापीठ परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन घेण्याबाबत महाविद्यालय स्तरावर आवश्यक नियोजन करण्यात ~~आले~~ यावे, असे ठरले.

सुचक - श्री. एन.बी. दिवसे
अनुमोदक - प्रा.(डॉ) एच. एम. देशमुख

Scanned with CamScanner

# MANAGING COMMITTEE
## कार्यकारी मंडळा

CODE : CSA 009 MEETING NO. / सभा नं _______ DATE / तारीख _______

| RESOLUTION NO. ठराव नं | PRESENT MEMBERS AND RESOLUTIONS हजर सभासद व ठराव |
|---|---|
| विषय क्र.४ :- | मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय. |
| | सभेपुढे कोणतेही विषय न आल्याने प्राचार्य तथा सदस्य सचिव यांनी उपास्थित सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर प्रतिनिधींचे आभार व्यक्त करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले. |
| | (signature) अध्यक्ष (signature) सचिव/प्राचार्य |
| | महाविद्यालय विकास समिती, महिला कला वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे. |

Scanned with CamScanner